# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.05.2025** **वारःबुधवार**

---

1. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताची मोठी कारवाई, पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील 9 दहशतवादी तळ उद्ध्वस्त
2. सिंदूर मोहिमेनंतर उत्तर भारतातील अनेक विमानतळ व्यवसायिक विमान उड्डाणांसाठी बंद
3. पाकिस्तानी सैन्याकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन सुरूच, काश्मीरच्या पूंछ-राजौरी भागात तोफगोळ्यांचा मारा आणि
4. बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची पदकांची लयलूट

**<u>ऑपरेशन सिंदूर</u>**

पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील ज्या ठिकाणी भारताविरोधी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जात असे दहशतवादी संघटनांचे तळ भारतीय सैन्यदलांनी मध्यरात्री सुरू केलेल्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेत उद्ध्वस्त करण्यात आले. या मोहिमेत नऊ तळांना लक्ष्य करण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. ही मोहीम अत्यंत काळजीपूर्वकपणे आणि कुठलाही तणाव निर्माण होणार नाही अशा तऱ्हेने राबविण्यावर भर होता. त्यामध्ये पाकिस्तानी सैन्याच्या कुठल्याही तळाला लक्ष्य करण्यात आलं नसल्याचं निवेदनात पुढे म्हटलं आहे. अलीकडेच पहलगाम इथं झालेल्या निर्घृण हल्ल्यानंतर अनेक पावलं उचलण्यात आली असून त्याअंतर्गत ही कारवाई केल्याचं संरक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलं.

मध्यरात्री ही कारवाई सुरु असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्णवेळ त्यावर देखरेख ठेवून होते. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय सैन्यानं हाती घेतलेल्या या ऑपरेशन सिंदूरवर समाज माध्यमावरून प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. भारत माता की जय असं त्यांनी एक्सवरील संदेशात म्हटलं आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर राजनाथ सिंह यांनी तिन्ही सैन्यदलांच्या प्रमुखांशी चर्चा केल्याचं सूत्रांनी सांगितलं. सिंदूर या लष्करी मोहिमेची सविस्तर माहिती देण्यासाठी भारतीय लष्कराच्या वतीनं आज सकाळी दहा वाजता पत्रकार परिषद घेण्यात येणार आहे.

दरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतानं दहशतवाद्यांच्या तळावर केलेल्या हल्ल्यावर प्रतिक्रिया व्यक्त केली असून काहीतरी घडणार आहे, याची लोकांना कल्पना होती असं ते म्हणाले. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव लवकरच संपेल अशी आशा असल्याचंही ट्रम्प म्हणाले. दरम्यान अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील स्थितीवर आपण बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं म्हटलं आहे. शांततापूर्ण तोडगा निघावा यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष दोन्ही देशांच्या नेतृत्वाशी चर्चा सुरू ठेवतील असंही त्यांनी पुढे सांगितलं.

**<u>पाक गोळीबार</u>**

दरम्यान पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन करणं सुरूच आहे, पाकिस्तानी सैन्यानं काल पूंछ -राजौरी भागातील भिंबर गल्ली भागात तोफगोळ्यांचा मारा केल्याची माहिती भारतीय लष्करानं दिली आहे. भारतीय सैन्यानं त्याला योग्य प्रत्युत्तर देत असल्याचं लष्करानं समाज माध्यमाद्वारे दिलेल्या माहितीत पुढे म्हटलं आहे. पाकिस्तानच्या या गोळीबारात तीन निरपराध नागरिकांचा मृत्यू झाल्याचं डीडी न्यूजच्या बातमीत म्हटलं आहे.

**वायुदल सराव**

या सर्व घडामोडींच्या सुरू असताना भारतीय वायु दल राजस्थानातील पाकिस्तान लगत असलेल्या आंतरराष्ट्रीय सीमेच्या भागात आजपासून दोन दिवस मोठा लष्करी सराव करणार आहे. हा पूर्वनियोजित नियमित प्रशिक्षण सराव असल्याचं वायु दलानं म्हटलं आहे. त्यामध्ये राफेल, सुखोई-30 आणि जग्वार विमानांसह सर्व प्रमुख लढाऊ विमानांचा समावेश असेल. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने जारी केलेल्या NOTAM किंवा वायु दलाच्या कर्मचाऱ्यांना दिलेल्या सूचनेनुसार, हा सराव आज दुपारी साडेतीन वाजता सुरू होणार असून उद्या रात्री साडेनऊ वाजेपर्यंत चालेल, यामुळे प्रभावित भागात हवाई क्षेत्र प्रतिबंधित केलं जाईल.

**विमानतळ बंद**

भारतीय सैन्यानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर देशाच्या उत्तर भागातील अनेक विमानतळ व्यवसायिक उड्डाणांसाठी बंद करण्यात आले आहेत. धरमशाला, लेह, जम्मू, श्रीनगर आणि अमृतसर हे विमानतळ पुढील सूचनेपर्यंत बंद राहणार आहेत असा दावा स्पाइस जेट या कंपनीनं समाजमाध्यमावरील संदेशात केला आहे. तर इंडिगोनं आपल्या प्रवाशांना या विमानतळावरून आपल्या उड्डाणाबद्दलची स्थिती जाणून घ्यावी असा सल्ला दिला आहे. याशिवाय एअर इंडियानंही लेह, जम्मू, श्रीनगर आणि अमृतसर, भूज, जामनगर, चंडीगड आणि राजकोट या विमानतळावरची आपली विमान उड्डाणं आज दुपारी 12 वाजेपर्यंत रद्द केली आहेत.

**मॉक ड्रील**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धस्थिती उद्भवण्याची शक्यता गृहीत धरून देशात 244 ठिकाणी आज मॉक ड्रिल म्हणजे युद्धजन्य परिस्थितीसाठी सज्ज राहण्याच्या दृष्टीनं सराव करण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयानं दिले आहेत. महाराष्ट्रातील अतिसंवेदनशील ठिकाणांमधे मुंबई, उरण आणि तारापूर यांचा समावेश आहे. याशिवाय ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-धाटाव-नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ-वायशेत, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी मॉकड्रील घेण्यात येणार आहे.

केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी काल त्यासंदर्भात सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांची बैठक घेतली. नागरी संरक्षण विभागाचे महासंचालक, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक आणि इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. हल्ला झाला तर सुरक्षेच्या दृष्टीनं करण्याच्या हालचालींविषयी नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं, तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणं हा या सरावाचा भाग आहे. दरम्यान पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांची आज भेट झाली. प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत सुमारे 40 मिनिटं महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा झाली.

**एफटीए**

भारत आणि युकेनं महत्त्वाकांक्षी आणि परस्पर लाभदायक मुक्त व्यापार करारासोबतच दुहेरी योगदान करार यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल युके चे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्याबरोबर चर्चा केली. या ऐतिहासिक करारांमुळे दोन्ही देशातली धोरणात्मक भागीदारी, व्यापार, गुंतवणूक, विकास, रोजगार निर्मिती आणि नवोन्मेषाला चालना मिळेल, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. स्टार्मर यांचं भारतात स्वागत करण्यासाठी आपण उत्सुक आहोत, असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान**

जगातलं एक महत्त्वाचं व्यापार आणि वाणिज्य केंद्र बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल सुरू असून, भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार करारामुळे व्यापार आणि एमएसएमई क्षेत्रासाठी अनेक नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते काल नवी दिल्लीत एका खासगी वृत्त वाहिनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. केंद्र

सरकारनं मानव केंद्रित वैश्विकरणाचं धोरण स्वीकारलं आहे; त्यामुळे आपल्याकडे विकासाचं मोजमाप केवळ बाजारातील चढ-उतारांवर नाही; तर सामान्य नागरिकांच्या; स्वाभिमानाने जगण्याच्या आणि स्वप्न पूर्ण करण्याच्या क्षमतेवर ठरतं, असं ते म्हणाले. भारताच्या हक्काचं पाणी आधी भारताबाहेर जात होतं, मात्र आता भारतातील पाणी भारतातच वाहणार आणि भारताच्याच उपयोगी पडणार; असं सूचक विधानही पंतप्रधानांनी केलं.

**<u>GLEX-परिषद</u>**

नवी दिल्लीत आजपासून 12 वी 'जागतिक अंतराळ संशोधन जागतिक शिखर परिषद अर्थात GLEX' सुरू होत आहे. या परिषदेचं उद्घाटन अंतराळ आणि अणुऊर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्या हस्ते होणार आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळवीर महासंघ, भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रो तसंच भारतीय अंतराळवीर सोसायटी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेली GLEX 2025 जागतिक अंतराळ क्षेत्रात भारताच्या विस्तारणाऱ्या नेतृत्वामधला एक मैलाचा दगड ठरला आहे. 2010 पासून, ग्लेक्स परिषद म्हणजे संवाद, सहकार्य आणि नवोन्मेष यासाठीचं एक प्रमुख व्यासपीठ बनलं आहे. 3 दिवस चालणाऱ्या या परिषदेत 36 देशांमधल्या 233 आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसह 1800 हून अधिक प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट सामन्यांमध्ये, काल रात्री मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्स संघानं डकवर्थ-लुईस-स्टर्न - डीएलएस नियमानुसार मुंबई इंडियन्स संघाचा तीन गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना, मुंबई इंडियन्सने निर्धारित वीस षटकांत आठ बाद 155 धावा केल्या. यजमान संघाकडून विल जॅक्सने सर्वाधिक 53 धावा केल्या तर सूर्यकुमार यादवने महत्त्वपूर्ण 35 धावा केल्या.

**<u>खेलो इंडिया</u>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत कालच्या तिसऱ्या दिवशी देखील महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. या स्पर्धेत पदक तालिकेत सध्या महाराष्ट्र अव्वल स्थानी असून महाराष्ट्राच्या खात्यात आत्तापर्यंत सहा सुवर्ण चार रौप्य आणि नऊ कास्य अशी 19 पदकं आहेत. सिद्धेश घोरपडेने सायकलिंकच्या स्क्रॅचरेस प्रकारात महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिलं. जलतरण क्रीडा प्रकारात आदिती हेगडे हिने सलग दुसऱ्या दिवशी सुवर्ण पदकांची हॅटट्रिक नोंदवत स्पर्धेत एकंदर 5 पदकं पटकावली. जलतरणामध्ये मुलींनी फ्री स्टाईल रिलेमध्ये सुवर्ण पदकाला गवसणी घातली. मल्लखांब क्रीडा प्रकारात पुरुष गटात महाराष्ट्र संघाने सलग सातव्यांदा रौप्य पदक पटकावलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.